★ भविष्यकालीन कार्यक्षेत्राच्या संधींवर
कोविड चा होनोय परिणाम ★

Class - 12th sci.

| PAGE No. | |
|---|---|
| DATE | / / |

Name-: Sanjyot Shahaji Waghmare.

"आपण मेलो, जग बुडाले" अशी म्हण खूप दिवसांपासून मी ऐकत होतो. पण जिवंत असतानासुद्धा अशी वेळ येईल असा कोणी विचारही केला नव्हता. फार-फार मोठ्या संकटातून जग जात आहे. जगातील प्रत्येक देशावर आणि त्यातील प्रत्येक गोष्टीवर परिणाम करणारा घटक म्हणजे हा यमाचे प्रतिरूप असलेला महाभयंकर रोग म्हणजे कोरोना. प्रत्येक देशाचा आणि त्या देशातील जनतेचा विचार करता आपणास असे दिसून येते कि राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री खासदार, आमदार आणि फिल्म स्टार यांना खूप प्रसिद्धी आणि खूप पैसा मिळत असे. जगभर याच लोकांचा डंका आणि बोलबाला असे. परंतु कोरोना या रोगामुळे सर्वजणगीच बसले आहेत आणि या रोगामुळे सर्वच नागरीक त्रस्त झाले आहेत. सर्व झगमगाट लोप पावला आहे.

सर्वच क्षेत्रावर कोविड-19 चा परिणाम झालेला दिसून येतो. मग ती कंपनी असो किंवा शेतीपासून आणखी कोणतेही क्षेत्र असू शकते. शेतीच्या उत्पादनांना जर बाजारपेठच उपलब्ध झाली नाही तर शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव कसा मिळणार ? शैक्षणिक क्षेत्रात सुद्धा पालक खासगी शाळांना शुल्क देण्यास तयार नाहीत. त्यामुळे खाजगी क्षेत्रातील शिक्षकांना काम तर शासकीय शिक्षकांच्या तुलनेत जास्त करावे लागत आहे मात्र त्याचा मोबदला त्यांना मिळणार नाही. जर त्यांचा पगार नाही झाला तर त्यांचे परिवार कसे चालतील ? कंपन्या बंद ठेवल्यामुळे कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या हजारो कामगारांना बेघर होण्याची वेळ आली आहे. मग प्रत्येकच क्षेत्रात कामगार नाही तर उत्पादन नाही आणि जर उत्पादन नाही तर सर्वच क्षेत्रात नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणजेच सर्वच क्षेत्रावर कोरोनाचा प्रभाव दिसणारच आहे.

गेल्या काही दिवसांपासून जगातील रोगांवर संशोधन करणाऱ्या 50 हजार संस्था बंद कराव्या लागल्या याला कारण एकच पैशाचा अभाव आणि कमतरता

OPPO A9 2020 · ©sunny ❤ DS...

OPPO A9 2020 · ©sunny DSLR

कोरोना या रोगाने जगाची विचार करण्याची पद्धतच बदलून टाकली. या पुढे जगात जशा आज आहेत तशाच पैसे कमावण्याच्या संधी असणार आहेतच परंतु आरोग्य आणि नैसर्गिक सृष्टी यांचा विचार करूनच पुढे जगावे लागेल. तसेच औषधांमध्येही संशोधन करण्यास खूप छान संधी आहे. जगाचा आणि रोगाचा विचार करता आरोग्य क्षेत्र तसेच संरक्षण या ठिकाणी ही खूप वाव आहे. आपण पाहिले तर अपणास असे दिसून येईल प्रत्येक ठिकाण किंवा एकही क्षेत्र असे नाही की ज्यावर कोरोनाचा परिणाम झाला नाही.

“कोरोनामुळे सगळेच घरात बसतायेत,
गोर-गरीब उपासीपोटी मरतायेत.
त्यांच ही जगणं अस्वस्थ होऊन गेलं,
खरचं करुणाने संपूर्ण जग हेलावून गेलं.”